# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०३.०९.२०२६ गुरुवार**

**१) मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते, वायु गळतीचे घटनेत परिस्थिती हाताळणारे अधिकारी व अंमलदार तसेच उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार व डायल ११२ चे विभागीय प्रमुख व अभियंता यांचा गौरव :—**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे पोलीस ठाणे मानकापुर येथील वायु गळतीचे घटनेचे गांभिर्य ओळखून त्वरीत कार्यवाही करणारे तसेच, उत्कृष्ट तपासकाम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार, त्याचप्रमाणे डायल ११२ चे विभागीय प्रमुख व अभियंता यांचा आज दिनांक ०३.०९.२०२६ रोजी पोलीस भवन येथील कॉन्फरन्स हॉल येथे प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

ज्यामध्ये पोलीस ठाणे मानकापुर येथील जलशुध्दीकरण केंद्रात झालेल्या क्लोरीन गॅस गळतीचे आपत्कालीन घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन, पोलीस ठाणे मानकापुर येथील अधिकारी व अंमलदार यांनी त्वरीत घटनास्थळी पोहोचुन, परिसरातील शेकडो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविे व घटनास्थळ परिसर सील केला तसेच इतर संबंधीत विभांगाशी समन्वय साधुन, वायु गळती आटोक्यात आणुन, बंद करण्यास सहकार्य केले. ही उत्कृष्ट कामगिरी करणारे वपोनि. हरीश काळसेकर, मसपोनि. निशा खोब्रागडे, पोउपनि. गोपाल राऊत, सफौ. प्रमोद चिमोटे, पोहवा. रुपम टेंभेकर, जितेंद्र दुबे, नापोअं. बाबुराम सयाम, विजय यादव, पोअं. सिदधार्थ मंडने, अनुप यादव, अजय घाटे यांचा तसेच, पोलीस ठाणे मानकापुर येथे दाखल वाहनचोरीचे गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन, त्याचेकडून ०६ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणुन गुन्ह्यातील ०७ मोटार सायकल वाहने असा एकुण ३,४०,०००/—रू. चा मुद्येमाल हस्तगत केला. गुन्हयाचा तपास करणारे वपोनि. हरीश काळसेकर, पोउपनि. सुनिल डगवाल, पोअं. आशिष सातपुते, रोशन बागडे यांचा त्याचप्रमाणे, डायल ११२ चे विभागीय प्रमुख श्री. निश्चय सातपुते व अभियंता श्री. सतिष कमाने, संकेत अवस्कर यांनी पोलीस विभागाचे ७ अधिकारी, २४ डिस्पॅचर अंमलदार व ३०४ बीट मार्शल असे एकुण ३३५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण दिले व वेळोवेळी येणाऱ्या तांत्रिक अडचणी तसेच, एमडीटी बाबत येणाऱ्या अडचणी अपडेट करुन उत्कृष्ट कार्य केले. सर्व उत्कृष्ट कार्य करणारे यांचा मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला.

याप्रसंगी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उपआयुक्त श्री. आदीत्य मिरखेलकर, श्रीमती अन्नपुर्णा सिंग हे हजर होते.





**२) मा. पोलीस आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्कुल बस सुरक्षा समितीची बैठक संपन्न :—**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०३.०९.२०२६ रोजी पोलीस भवन येथील कॉन्फरन्स हॉल येथे जिल्हा स्कुल बस सुरक्षा समितीची बैठक १६.३० वा. सुरू होवुन १८.०० वा. संपन्न झाली.

बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांनी उपस्थीत शिक्षण विभागाचे तसेच, प्रादेशिक परीवहन विभागाचे अधिकारी व समितीतील सदस्य यांना महत्वाच्या सुचना देवुन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक बाबी सांगुन त्यास प्राथमिकता देण्यात यावी असे सुचविले. मा. पोलीस आयुक्त यांनी स्कुलबसचे वाहन चालक यांचेकरीता ड्रेसकोड व बॅचबिल्ला असणे आवश्यक असल्याचे सांगुन, प्रत्येक शाळेला स्कुलबस अनिवार्य असली पाहीजे तसेच, शाळेची परीवहन समितीची प्रादेशिक परीवहन अधिकारी (आर.टि.ओ.) यांनी नेहमी तपासणी केली पाहीजे. तसेच, दर ०३ महीन्यांनी त्यांची बैठक घेवुन, आवश्यक सुचना दिल्या पाहीजे. शाळेचे शिक्षक व पालक यांची सुध्दा बैठक घेणे आवश्यक असुन, शाळेचे ठिकाणी खाजगी वाहनांची नियीमत तपासणी करावी अशा सुचना दिल्या.

बैठकीमध्ये मा. श्री. आदीत्य मिरखेलकर पोलीस उपायुक्त (वाहतुक) नागपुर शहर, श्रीमती पुजा गायकवाड मा. पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय) मा. सौ. शारदा किनारकर शिक्षण विस्तार अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक जिल्हा परीषद, नागपुर), श्री. विजय चव्हाण (आर.टी.ओ. नागपुर ग्रामिण), श्री. योगेश लुंगे, मा. प्रशासकीय अधिकारी वाहतुक (म.न.पा.) व श्री. अविनाश राऊत, प्रविण बागडे, सुनिल डोंगराजल उपप्रादेशिक परीवहन अधिकारी व समितीचे सदस्य हे हजर होते.





**(कामगिरी)**

**एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ०४ ईसमाविरूध्द कारवाई.**

दिनांक ०२.०९.२०२६ चे रात्री, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत रेल्वे स्टेशन समोर, ०३ वेगवेगळ्या ठिकाणी रेड कार्यवाही केली असता, तेथे आरोपी क्र. १) मोहम्मद तन्वीर मोहम्मद शाकीर, वय २६ वर्षे, रा. मोहन नगर, खलाशी लाईन, सदर, नागपुर २) खुमनचंद लखनलाल शाहु, वय २६ वर्षे, रा. मोहन नगर, खलाशी लाईन, सदर, नागपुर ३) शेख जावेद शेख वहीद, वय ३८ वर्षे, रा. सुभान नगर, पारडी, नागपुर हे शासनाने प्रतीबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा वेगवेगळे फ्लेवरचे तंबाखु, पानमसाला, तंबाखु पाऊच विक्री करीता बाळगुन मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन एकुण किंमती अंदाजे ३३,८४०/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

तसेच, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत मोठा ताजबाग येथील बाबा ताज पॅलेस येथे रेड कार्यवाही केली असता, तेथे आरोपी मोहम्मद मालाधारी, वय ५४ वर्षे, रा. आशिर्वाद नगर, शहंशाह चौक, मोठा ताजबाग,

सक्करदरा, नागपुर हा शासनाने प्रतीबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा वेगवेगळे फ्लेवरचे तंबाखु, पानमसाला, तंबाखु पाऊच विक्री करीता बाळगतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण किंमती अंदाजे ३७,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी व सक्करदरा येथे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करून, एकुण ७०,४८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात, सपोनि. भगवान कोळी, पोहवा. विजय गिरी, आशिष गायधने, पोअं. अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षिरसागर व चंद्रकांत यांनी केली.





**<u>(गुन्हे)</u>**

**<u>१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०३.०९.२०२६ चे ११.५० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, सम्राट चौक, आठवा मैल परीसरात एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे हद्दपार ईसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शुभम चरणदास मेंठे, वय ३२ वर्षे, रा. पालकर नगर, आठवा मैल, वाडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने परीसरात समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे यशोधरानगर :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०३.०९.२०२६ चे १५.०५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, नामदेव नगर मैदानामध्ये एक काळे पट्टे असलेली पिवळ्या रंगाची टि—शर्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसल्याने, त्यास घेराव करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी छोटी तलवार काढुन घेतली. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख जुनैद शेख वकील, वय

२२ वर्षे, रा. नुरी मस्जीद जवळ, कुदंनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी छोटी तलवार किंमती ५००/—रू. ची जप्त करण्यात आली आहे.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने छोटी तलवार घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का, सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** कु. अंजली उर्फ योगीनी रघुनाथ करपाते, वय २० वर्षे, रा. मुंगसाजी नगर, प्लॉट नं. १८, दिघोरी, नंदनवन, नागपूर ही दिनांक २५.०८.२०२६ रोजी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, केस— काळे लांब, अंगात— फिक्कट गुलाबी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते. ओळख— छातीचे डाव्या बाजुला गोंदण मिटवल्याचे निशान आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :—** कु. अंजली उमेश रंगारी, वय १७ वर्षे, रा. प्लॉट नं. १३८, कुंजीलालपेठ, आंबेडकर नगर, अजनी, नागपूर ही दिनांक ३१.०८.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरून कॉलेजला जाते असे सांगुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. शोध घेतला असता, मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, केस— काळे लांब, भाषा— हिंदी/मराठी बोलते.

**३) पोलीस ठाणे तहसिल :—** श्रीमती आशा तुकाराम मोहनकर, वय ६० वर्षे, रा. जागनाथ बुधवारी, मच्छीसाथ, लांजेवार गल्ली, तहसिल, नागपूर ह्या दिनांक ०१.०९.२०२६ चे २०.०० वा. पोलीस ठाणे तहसिल हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावहा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे पांढरे लांब, अंगात— गुलाबी रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— उजव्या हातावर 'अंकुश राजेंद्र' असे नांव गोंदलेले आहे.

**४) पोलीस ठाणे नंदनवन :—** प्रियांशु सुभाष पंडीत, वय १८ वर्षे, रा. प्लॉट नं. ४१९, हिवरी नगर, नंदनवन, नागपूर हा पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, भाषा— हिंदी/मराठी बोलतो.


कु. अंजली


कु. अंजली


श्रीमती आशा


प्रियांशु

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**